# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 30/04/2020 (गुरूवार)

(सकाळ)

### पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे जुगार अडयावर धाड
### स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणची कारवाई

स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणचे पोलिस निरिक्षक श्री. अनिल जिट्टावार यांना दिनांक 29/04/2020 रोजी खात्रीशीर गुप्त माहितगारामार्फत माहिती मिळाली की, लॉकडाउन सुरु असतांना देखील शासनाने आदेशीत केलेल्या संचारबंदीचे उल्लंघन करुन काही इसम हे भरतवाडा शिवारात पोलिस ठाणे कळमेश्वर हद्दीत जुगार खेळत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन दिनांक 29/04/2020 रोजी चे दुपारी 16.00 वा. सुमारास स्थानिक गुन्हे शाखाचे पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून छापा घातला असता काही इसम 52 ताशपत्यावर पैशाची बाजी लाऊन हारजीतचा खेळ खेळतांना दिसून आले. पोलिसांना पाहून ते पळू लागताच, पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेण्यात आले. आरोपी 1) चंद्रशेखर श्रिपद ढोरे, वय 48 वर्ष, रा. गोरेवाडा, नागपुर, 2) वसंत गुलाबराव थूल, वय 46 वर्ष, रा. बोरगांव, नागपुर, 3) आश्विण दुर्योधन मंडपे, वय 40 वर्ष, रा. ब्राम्हणवाडा, नागपुर., 4) रामलाल रामप्रसाद यादव, वय 59 वर्ष, रा. टाकली नागपुर, 5) गेंदलाल शामलाल प्रजापति, वय 59 वर्ष, रा. गोरेवाडा, नागपुर, 6) हेमंत भीमराव नीतनवरे, वय 49 वर्ष, रा. फ्रेंडस् कॉलनी नागपुर, 7) रविंद्र बाळकृष्ण पखीद्दे, वय 62 वर्ष रा. गोरेवाडा नागपुर व 8) कृष्ण जगनराव लोनारे, वय 37 वर्ष, रा. भरतवाडा नागपुर यांचे कडून खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

1) 9110/– रुपये रोख रक्कम.
2) 6 मोबाइल संच किमती 37000/– रुपये
3) 1 स्विफ्ट डीझायर कार व 4 दुचाकी वाहने किमती 10,00,00/– रुपये.
4) 52 ताशपत्ते व इतर साहित्य.

असा एकुण 10,45,110/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे.कळमेश्वर येथे आरोपीतांविरुध्द कलम 12(अ) मुंबई जुगार कायदा सहकलम 188 भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे नतृत्वात

पोउपनि नरेंद्र गौरखेडे, पोउपनि सचिन मत्ते, सफौ. जयप्रकाश शर्मा, नापोशि सत्यशील कोठारे, पोशि प्रणय बनाफर, महेश बिसने, वीरेंद्र नरड व चालक सहायक फौजदार साहेबराव बहाळे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर